# बोरगड संवर्धन राखीव





बोरगड हे महाराष्ट्रातील पहिले संवर्धन राखीव क्षेत्र आहे. ५ मार्च २००८ रोजी याला संवर्धन राखीवचा दर्जा मिळाला. नाशिक शहरापासून हे २० किलोमीटर अंतरावर आहे. बोरगड डोंगराच्या पायथ्याशी तुंगलदरा हे गाव आहे व जवळच रामशेज किल्ला आहे. याची समुद्रसपाटीपासूनची उंची अंदाजे ३२०० फूट आहे. त्र्यंबकरांग आणि सातमाळरांग यातील हा सर्वात उंच डोंगर आहे. नेचर कॉन्झरव्हेशन सोसायटीचे दिवंगत विश्वरूप राहा व वनविभाग यांच्या प्रयत्नामुळे हे संवर्धन राखीव होण्यास मदत झाली. महिंद्रा आणि महिंद्रा कंपनी, भारतीय वायू सेना, नेचर कॉन्झरव्हेशन सोसायटी आणि वनविभाग यांनी मिळून याठिकाणी दीड ते दोन लाख वृक्षांची लागवड केली. येथे बांबू, साग, शिसम, ऐन, खैर, आपटा, अर्जुन, पांगारा, काटेसावर हे वृक्ष आढळतात. कंदीलपुष्प या दुर्मीळ वनस्पतींच्या ३ प्रजाती येथे आढळून येतात. अनेक प्रजातींचे पक्षी येथे आढळून येतात. रानमांजर, तरस हे सस्तन प्राणी येथे दिसून येतात.





गवती खरपुडी



गडांबी कांदा, गुलाबी कर्णफूल





# बोरगड संवर्धन राखीव




**कसे पोहचाल :**
**जवळचे विमानतळ :** नाशिक – १९ किमी.
**जवळचे रेल्वे स्टेशन :** नाशिक – १५ किमी.
**रस्त्याने :** नाशिक – १५ किमी.